# हिंजवडी पोलीस ठाणे,पिंपरी चिंचवड
# प्रेसनोट ता. ३/०८/२०२२

## *१ कोटी रुपयांपासुन १०० कोटी रुपयांपर्यत कर्ज देणाच्या बहाणा करुन पैसे लुटणाऱ्या जलाराम एन्टरप्राईजेस लिमिटेड या बोगस कंपनी चालकांना हिंजवडी पोलीसांकडुन अटक*

फिर्यादी नामे श्रीराम प्रल्हाद पिंगळे वय ४३ वर्षे, रा ए ९ -५०२ करिष्मा को ओप सोसा. कोथरुड पुणे यांचा मित्र नामे जयेश हरिचंद्र पाटील यांस फेसबुकवर आलेल्या जलाराम इंटरप्रायजेस प्रायव्हेट फंड यांचे व्यवसायासाठी एक कोटीपासून कर्जाचे जाहीरातीवरून त्यांचेशी संपर्क साधुन कंपनीचे एका महिलेने त्यांना बी -१००८ तिर्थ टेक्नोस्पेस बेगलोर मुंबई हायवे बाणेर पुणे या ठिकाणी बोलावून घेतले. तेथे फिर्यादी व त्याचे मित्र सदर ठिकाणी जावुन लोन बाबत चौकशी करून, १ कोटीसाठी ५ लाख रुपये कॅश याप्रमाणे सिक्युरीटी डिपॉझीट दयावे लागेल असे सांगुन ४५ दिवसात लोन दिले जाईल अशी माहिती तेथील महिला मॅनेजर नामे राधीका यतीश आंबेकर, रा. २/३२, राधा नगर को ऑप हौ सोसा, १२ वा रोड कल्याण पश्चिम मुंबई हीने सांगितली. त्यावेळी फिर्यादी यांना जलाराम एन्टरप्राईजेस ही कपंनी फसवणुक करण्याची शक्यता असल्याबाबत संशय आल्याने त्यांनी हिंजवडी पोलीस ठाणे येथे येवून सदर बाबत माहिती दिली असता सपोनि राम गोमारे यांनी त्यांचेकडुन सर्व माहिती घेवून जलाराम एन्टरप्राईजेस कंपनीला गिऱ्हाईक म्हणुन फोन करून माहिती घेतली असता सदर माहिती अपुर्ण व विश्वासपात्र नसल्याचे समजल्याने फिर्यादी यांची तक्रार घेवून हिंजवडी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ६८५/२०२२ भादवि कलम ४२०, ५११, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो. श्री. विवेक मुगळीकर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि राम गोमारे, पो.हवा. योगेश शिंदे, पो.हवा.कैलास केगले, पो.शि. कारभारी पालवे, पो.कॉ. रितेश कोळी, महिला पो.कॉ. ढोणे, असे बी -१००८ तिर्थ टेक्नोस्पेस बेगलोर मुंबई हायवे बाणेर पुणे या ठिकाणी प्रत्यक्ष जावुन तेथील महिला मॅनेजर हीस विचारपुस करता तिचेकडे कंपनीचे रजिस्ट्रेशन नसल्याचे व कंपनीने आरबीआय च्या गाईडलाईनप्रमाणे परवानगी नोंदणी नसल्याची खात्री झाली. तसेच सदर ठिकाणी ७ महिला यांना अपॉईटमेंट लेटर न देता नोकरीस ठेवल्याचे निष्पन्न झाल्याने, सदर ठिकाणी छापा टाकुन कारवाई करुन सदर कपनीचे १३ कॉम्पुटर, ७ मोबाईल दोन कर्ज प्रकरण संबंधी कागदपत्रे जप्त करून यातील महिला मॅनेजर राधीका यतीश आंबेकर, रा. २/३२, राधा नगर को ऑप हौ सोसा, १२ वा रोड कल्याण पश्चिम मुंबई हीस महिला पोलीस कॉन्सटेबल ढोणे यांचे मदतीने दि. २३/०७/२०२२ रोजी १८:१५ वा. गुन्हयात अटक केली.

यातील महिला आरोपी हीचेकडे केलेल्या तपासात तिचे साथीदार संदीप समुद्रे ही कंपनी चालवित होता व प्रोप्रा. जयजित गुप्ता याचे नाव असल्याचे समजल्याने यातील आरोपी क्र. २) संदीप रामचंद्र समुद्रे वय.-३७ रा. मेट्रो रेसिडेन्सी कल्याण पुर्व ठाणे आरोपी क्र. ३) जयजित रामसनेही गुप्ता वय-३६ रा.रेतीबंदर रोड रेल्वे फाटकमोठागाव शिवशांती चाळ रुम नं. २ डोंबीवली पश्चिम कल्याण यांना मुंबई येथुन ताब्यात घेवून दि. २४/०७/२०२२ रोजी २३:५० वा. अटक करण्यात आली. सदर प्रकारे ठाणे व नवी मुंबई वाशी सेक्टर ३० येथे या दोघांनी यापुर्वी कंपनीची शाखा सुरु करुन तेथेही बऱ्याच लोकांची फसवणुक केली असल्याची माहिती आहे. तशी तेथील पोलीसांना माहिती दिली आहे.